## १) विकास सोसायटी मार्फत कर्जपुरवठा :-

## ३) सोसायट्यामार्फत लघु उद्योग  कर्जे  :-

सदर कर्जासाठी व्यक्तिगत सभासदांनी सेवा सोसायटीला व सेवा सोसायटीने कर्जासाठी द्यावयाची कागदपत्रांची पूर्तता करुन देणेची असून, बँकेत सोसायटीचे "मुख्य खाते" राहून सभासदाचे "पोटखाते" राहणार आहे. सदर खातेवर सभासदाने चेक बुकने गरजेप्रमाणे व्यवहार करणेचा आहे. यासाठी सोसायटीने सभासदाचा सहीचा नमूना व संस्थेचा पंचकमिटीचा ठराव दिलेनंतर कॅश क्रेडीट खात्यावर सभासदास व्यवहार करता येईल. गुऱ्हाळ घर उभारणीसाठी मध्यम मुदत व खेळत्या भांडवलासाठी क्लिन कॅश क्रेडीट कर्ज याशिवाय सदर योजनेअंतर्गत खाली दिलेले व्यवसाय व अशा स्वरुपाच्या व्यवसायासाठी सदरचे धोरण राहील.

१ **व्यवसायाचे नांव -** प्रिटींग प्रेस, बेकरी, सॉ मील, फर्निचर तयार करणे, विट उद्योग, पिठाची चक्की, कांडप मशिन, सायकल दुकान, लाकूड वखार, पोहे कारखाना, किराणा दुकान, रेडीमेट कापड दुकान, भांडी दुकान, स्पेअर पार्टस् दुकान, पशुखाद्य दुकान, धान्य दुकान इ.

२ **कर्जदाराची पात्रता -** कर्ज मागणी करणारा लाभार्थि हा सेवा सोसायटीचा सभासद असला पाहिजे, सोसायटी अगर अन्य संस्था/बँकेचा थकबाकीदार नसवा, एका सभासदास एका युनिटसाठी कर्ज दिले जाईल, सभासदाने व्यवसाय सुरु करणाऱ्या व्यवसायासंबंधीची माहिती, मशिनरी कोटेशन व इतर साहित्य इत्यादीचा तपशिल दिला पाहिजे. सभासद व्यवसाय करणार असलेल्या व्यवसायाचे आवश्यक रजिस्ट्रेशन/परवाना घेतला पाहिजे, सभासदाने कर्ज प्रकरणासोबत व्यवसायाचे मासिक उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक व इतर आवश्यक कागदपत्रे जोडले पाहिजेत.

३ **तारण -** सभासदाने कर्जास तारण म्हणून त्यांचे जमिनीचे क्षेत्रावर  तसेच  व्यवसायाच्या स्थावर व जंगम मालमत्तेवरही बँक कर्ज बोजाची नोंद करुन दिली पाहिजे.